THANE POLICE COMMISSIONERATE

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
# ठाणे शहर पोलीस

**प्रेस नोट** दिनांक : ०६/०४/२०२४

**मध्यवर्ती पोलीस स्टेशनचे हददीतील गुलराज टॉवर, उल्हासनगर–३ या ठिकाणी सुमारे ०६ किलो गांजा पोलीसांनी केला जप्त.**

---

पोलीस आयुक्त ठाणे शहर,श्री. आशुतोष डूंबरे यांनी आगामी लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने अंमली पदार्थ विक्री करणारे, तसेच अवैदय शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करणे बाबत आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना आदेशीत केले. तसेच अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ डॉ.श्री.सुधाकर पठारे, तसेच सहा.पोलीस आयुक्त उल्हासनगर विभाग,श्री.अमोल कोळी यांनी पोलीस ठाणे हददीत अत्यंत प्रभावीपणे पेट्रोलींग करुन अंमली पदार्थ विक्री करणारे इसमांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शंकर आवताडे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे दिनांक. ०५/०४/२०२४ रोजी मध्यवर्ती पोलीस स्टेशनचे पोनि (गुन्हे)/श्री. उमेश सावंत, सपोनि/श्री. विशाल चिटणीस, सपोनि/श्री. राकेश शेवाळे व त्यांचे सोबत गुन्हे शोध पथकाचे पोहवा/२१५ दत्तू जाधव, पोहवा/३८७३ प्रमोद जाधव, पोहवा/६८९५ दत्तात्रय जाधव, पोशि/७०४५ वैजिनाथ राख, पोशि/४६४१ बाबासाहेब ढाकणे, पोशि/३३२४ विकास पाटील, पोशि/२६४३ अरविंद पवार असे मध्यवर्ती पोलीस स्टेशनचे हददीमध्ये पेट्रोलींग करीत असताना रात्री २०.३० वा.चे सुमारास गुलराज टॉवर परिसरामध्ये शाहू ब्रिज जवळ, रोडवर एक इसम हातात पिशवी घेवून संशयास्पदरित्या जात असल्याचे दिसून आल्याने व पोलीस पथकास पाहताच तो घाई घाईने निघून जावू लागला म्हणून त्याचेवर संशय बळावल्याने सदर पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर इसम नामे सोमनाथ धर्मा सोनवणे वय–५२ वर्षे रा. मु.पो. भोकर ता. जि.जळगाव यास ताब्यात घेवून त्याचेकडील पिशवीची पाहणी केली असता त्या पिशवीमध्ये ७२०००/–रुपये किंमतीचा सुमारे ०६ किलो वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आल्याने सदरचा गांजा जप्त करुन त्याचे विरोधात मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. ५२२/२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ चे कलम– ८(क), २०(ब) **ii** (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात अटक करण्यात येवून त्याची न्यायालयातून पुढील ०५ दिवस पोलीस कोठडी घेण्यात आलेली असून गुन्हयाचा तपास वपोनि सो. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/श्री. राकेश शेवाळे हे करीत आहेत.

वरील उल्लेखनिय कामगिरी ही अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग, श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४,डॉ.श्री सुधाकर पठारे, सहाय्यक पोलीस आयुक्त,श्री अमोल कोळी, उल्हासनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शंकर आवताडे, मध्यवर्ती पोलीस स्टेशन यांनी दिलेल्या सुचनांनुसार पोनि (गुन्हे)/श्री. उमेश सावंत, सपोनि/श्री. विशाल चिटणीस, सपोनि/श्री. राकेश शेवाळे व त्यांचे सोबत गुन्हे शोध पथकाचे पोहवा/२१५ दत्तू जाधव, पोहवा/३८७३ प्रमोद जाधव, पोहवा/६८९५ दत्तात्रय जाधव, पोशि/७०४५ वैजिनाथ राख, पोशि/४६४१ बाबासाहेब ढाकणे, पोशि/३३२४ विकास पाटील, पोशि/२६४३ अरविंद पवार यांनी केली आहे.

***